दिनांक –२९ /०८ /२०१९

\- प्रेसनोट –

## मौजेसाठी वाहन चोरी करणाऱ्या दोन तरुणाना अटक चोरीची ९ वाहने जप्त.

---

आज दि.१८/०८/२०१९रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उप- निरिक्षक सुबराव लाड व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी गणेश चिचंकर व अभिजीत जाधव यांना त्याच्या खास बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की, पांढऱ्या रंगाचा फुल भायाचा टिशर्ट, व लाल रंगाचा टिशर्ट घातलेल्या दोन इसम हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मो.सा. घेवुन कात्रज तळयाच्या जवळ फिरत आहे. त्याच्याकडील मोटार सायकलच्या नंबर प्लेटला त्यांनी चिखल लावल्यासारखे दिसत आहे. मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी तपास पथकातील स्टाफ यांना पेट्रोलिंग करण्यास सांगुण संशयीत इसम मिळुन आल्यास त्यांना ताब्यात घेण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या. मिळालेल्या बातमीप्रमाणे सदर भागात पेट्रोलिंग करत असताना बातमीप्रमाणे दोन इसम हे शेलार मळयाकडुन कात्रज तळयाकडे येत असताना दिसले. त्या इसमाना स्टाफच्या शिताफिने पकडुन त्यांना आहे. त्या स्थितीत ठेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव १) शंभु राजेंद्र खवळे, वय २० वर्षे, रा. थेऊर गणपती मंदिराच्या मागे, भिमनगर, ता. हवेली, जि.पुणे मुळ रा. वैदयवाडी, खजुरेवस्ती, सन.३१६, दर्गा समोर, हडपसर पुणे २) निलेश मिटु कदम, वय १९ वर्षे, रा. खंडोबा मंदिराच्या जवळ, थेऊर गाव, ता.हवेली जि. पुणे, मुळ रा. येळम, ता.आष्टा, जि बीड असे सांगितले. त्यावेळी त्याच्याकडे मोटार सायकलच्या मागील नंबर प्लेटवर चिखल का ? लावला असे विचारपुस केली असता ते उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे देवु लागले. त्यावेळी त्या इसमांना ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याच्या ताब्यात मिळुन आलेल्या मोटार सायकल बाबत गु.र.न.५६२/२०१९ भा.द.वि.कलम. ३७९ गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाल्याने त्यांना अटक करुन अधिक सखोल तपास केला असता त्यांनी भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीतुन १ हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर, १ ड्रिम युगा, १ पल्सर, १ यमाहा, शिवाजीनगर पोलीस ठाणे हददीतुन येथुन १ पॅशन प्रो, लोणी काळभोर पोलीस ठाणे हददीतुन १ सुझुकी कंपनीची ॲक्सेस, १ होडा साईन, यवत पोलीस ठाणे ठाणे हददीतुन १ सी. बी. साईन अश्या एकुण ८ मोटार सायकल हया मौजेसाठी चोरी केल्याची कबुली दिली आहे. त्याच्याकडुन एकुण २,२०,०००/- रु कि मो.सा. जप्त करण्यात आल्या आहे. तसेच भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे गुरन.७२/२०१० भादवि कलम. ३७९ प्रमाणे दाखल असणारा गुन्हा हा आरोपी १) भानुदास तुकाराम धोत्रे, वय ४० वर्षे, रा. खंडाळा, जि सातारा २) सुनिल रमेश जाधव रा. मु.पो. वाजेघर, ता. वेल्हा, जि. पुणे यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले् असुन त्याच्याकडुन ही होंडा कंपनीची पॅशन प्रो. २५,०००/-रु किं जप्त करण्यात आली आहे. अश्या चोरीच्या एकुण ९ मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. सदर आरोपी याची पोलीस कस्टडी रिमांड घेवुन त्याच्याकडे आणखीन मोटार सायकल चोरी केल्या आहेत का? याबाबत तपास सुबराव लाड, पोलीस उप निरीक्षक हे करित आहेत.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पुर्वे प्रादेशिक विभाग श्री श्रीकात तरवडे, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री शिरीष सरदेशपांडे साो, सहा. पोलीस आयुक्त श्री मालोजीराव पाटील साो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, गणेश चिचंकर, अभिजीत जाधव, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, कुंदन शिदे, सर्फराज देशमुख, राहुल तांबे, सचिन पवार, योगेश सुळ यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.